**अनुदान वितरण आदेश**

**समग्र शिक्षा, समावेशित शिक्षण (Inclusive Education) उपक्रमांतर्गत (प्राथमिक व माध्यमिकस्तरावरील) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी Identification and Assessment या शिर्षाखाली (Medical Assessment Camps) करिता प्राप्त निधी गटशिक्षणाधिकारी यांना वर्ग करणे बाबत.**

**जिल्हा परिषद, अहिल्यानगर**
**शिक्षण विभाग प्राथमिक जिल्हा परिषद**
**आदेश जा.क्र. कार्या-३/सशि/IE/ ६४ /२०२५**
**दि. २१ /०७ /२०२५**

**संदर्भ :-** मा. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचे पत्र जा.क्र. मप्राशिप/सशि/लेखा/Med.Ass.Camp/IE-ELE, Sec-Rec. (GEN, SC, ST)/२०२५-२६/२१२७ दिनांक १८/०७/२०२५

**प्रस्तावना-** समग्र शिक्षा उपक्रमांतर्गत समावेशित शिक्षण हा महत्वाचा उपक्रम आहे. या उपक्रमांतर्गत विशेष गरजा असणा-या मुलांना शिकण्याच्या मुख्य प्रवाहात टिकून ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी लागु करण्यात आलेल्या अपंग व्यक्ती कायदा अधिनियम १९९५ अन्वये समान संधी, हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग आणि अधिनियम २००९ अन्वये मुलांच्या शिक्षणाचा मूलभूत हक्क या कायद्यानुसार विशेष गरजा असणा-या ० ते १८ वयोगटातील पूर्व प्राथमिक (० ते ६ वयोगट), प्राथमिक (इयत्ता १ ली ते ८वी) माध्यमिक व उच्च माध्यमिक (इयत्ता ९ ते १२ वी) मधील मुलही शिक्षणा पासून वंचित राहू नये, शाळेत गळतीचे प्रमाण शुन्य व्हावे, शाळेत टिकून रहावे हा मानस आहे.

**कार्यालयीन आदेश** - उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. १ चे अवलोकन करावे, समग्र शिक्षा समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत विशेष गरजा असणा-या ० ते १८ वयोगटातील प्राथमिक (इयत्ता १ ली ते ८) व माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १२ वी) मधील विद्यार्थ्यांना शालेय आरोग्य तपासणी मार्फत जिल्हा / तालुकास्तरावर संदर्भित करण्यात येते, सदर विद्यार्थ्यांना प्राथमिक आरोग्य तपासणी, तालुकास्तरीय दिव्यांगत्व निदान व उपचारात्मक शिबीर, ऑडिओमेट्री, चष्मानंबर काढणे, Psychological Assessment (कारक, सामाजिक, भाषा, भावनिक इ.) साहित्य मोजमाप शिबीरे, शस्त्रक्रिया पूर्व तपासणी यासारखी शिबीरे वारंवार आयोजित करावी लागतात. या शिबीरांच्या आयोजनासाठी दिव्यांगत्व निदान व उपचारात्मक शिबीरासाठी खालील प्रमाणे निधी मंजूर आहे. Medical Assessment Camp (प्राथमिकस्तर) या शिर्षाखाली प्रत्येकी तालुका रु.१०,०००/- व (माध्यमिकस्तर) या शिर्षाखाली प्रत्येकी तालुका रु.१०,०००/- या प्रमाणे १४ तालुक्यांसाठी रु.२,८०,०००/- निधी मंजूर आहे. त्यानुसार खालील प्रमाणे निधी तालुक्यांना वर्ग करण्यास या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | तालुका | प्राथमिकस्तर | माध्यमिकस्तर | गटशिक्षणाधिकारी यांना वर्ग करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | अकोले | १०,०००/- | १०,०००/- | २०,०००/- |
| २ | संगमनेर | १०,०००/- | १०,०००/- | २०,०००/- |

| अ.क्र. | तालुका | प्राथमिकस्तर | माध्यमिकस्तर | गटशिक्षणाधिकारी यांना वर्ग करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| ३ | कोपरगाव | १०,०००/- | १०,०००/- | २०,०००/- |
| ४ | राहाता | १०,०००/- | १०,०००/- | २०,०००/- |
| ५ | राहुरी | १०,०००/- | १०,०००/- | २०,०००/- |
| ६ | श्रीरामपूर | १०,०००/- | १०,०००/- | २०,०००/- |
| ७ | नेवासा | १०,०००/- | १०,०००/- | २०,०००/- |
| ८ | शेवगाव | १०,०००/- | १०,०००/- | २०,०००/- |
| ९ | पाथर्डी | १०,०००/- | १०,०००/- | २०,०००/- |
| १० | जामखेड | १०,०००/- | १०,०००/- | २०,०००/- |
| ११ | कर्जत | १०,०००/- | १०,०००/- | २०,०००/- |
| १२ | श्रीगोंदा | १०,०००/- | १०,०००/- | २०,०००/- |
| १३ | पारनेर | १०,०००/- | १०,०००/- | २०,०००/- |
| १४ | अहिल्यानगर | १०,०००/- | १०,०००/- | २०,०००/- |
| **एकूण** | | **१,४०,०००/-** | **१,४०,०००/-** | **२,८०,०००/-** |

दिव्यांगत्व निदान व उपचारात्मक शिबीरासाठी आपल्या अहमदनगर जिल्ह्यातील प्रति तालुका प्राथमिकस्तर रु.१०,०००/- (अक्षरी दहा हजार मात्र) व माध्यमिकस्तर या शिर्षाखाली प्रत्येकी तालुका रु.१०,०००/-(अक्षरी दहा हजार मात्र) या प्रमाणे १४ तालुक्यांसाठी रु. २,८०,०००/- (अक्षरी दोन लक्ष ऐंशी हजार मात्र) निधी खालील शिबीरे आयोजित करण्यासाठी तालुकास्तरावर गट शिक्षणाधिकारी सर्व यांना खालील सूचनेनुसार अग्रीम देण्यात येत आहे.

**सूचना -**

१. सदर रक्कम ही तालुकास्तरावर त्याच प्रमाणे जिल्हा स्तरावर होणा-या शिबीरासाठी प्राथमिक व माध्यमिकस्तरावरील विद्यार्थी उपस्थित ठेवणे व त्यांचे निदान व उपचार करण्यासाठी आहे.

२. प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी तालुकास्तरीय शिबीरे हे तालुका वैद्यकिय अधिकारी यांच्या सल्ल्याने व मान्यतेने आयोजित करावे.

३. शिबीरस्थळी प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या पालक व विद्यार्थी यांना बैठक व्यवस्था करण्यात यावी.

४. जिल्हास्तरावरील विविध व अलिम्को संस्थेमार्फत आयोजित मोजमाप शिबीरास साहित्य साधनासाठी संदर्भित असणा-या प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना नियोजना नुसार उपस्थित ठेवावे.

५. प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी शस्त्रक्रिया पूर्व तपासणी शिबीरासाठी विद्यार्थी उपस्थित ठेवावे.

६. दृष्टीमूल्यमापन - तालुकास्तरीय निदान व उपचार शिबीरामध्ये प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील दृष्टीदोष असलेल्या विद्यार्थ्यांची चष्मा नंबर व मंददृष्टी साहित्य तपासणी करण्यात यावी व आवश्यकतेनुसार चष्मे व इतर साहित्य देण्यात यावेत.

७. श्रवणमूल्यमापन शिबीरामध्ये श्रवण-हास तपासणीसाठी संदर्भित केलेल्या प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची यादी जिल्हा कार्यालयास सादर करावी व आवश्यकतेनुसार साहित्य देण्यात यावेत.

८. मानशास्त्रीय शैक्षणिक मूल्यमापन प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी शिबीरस्थळी मूल्यमापन करण्यात यावे. त्यासाठी आपल्या जिल्ह्यात गट साधन केंद्र अधिनस्त असलेल्या सायकोलॉजिस्ट व वाचउपचार तज्ञ यांना संपर्क करुन मदत घ्यावी.

९. प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील अस्थिव्यंग, बहुविकलांग, सेरेब्रल पाल्सी, मतिमंद, अध्ययन अक्षम, स्वमग्न, स्नायूंची विकृती, शारीरिक वाढ खुंटणे, स्नायुंची विकृती, मज्जासंस्थेचे तीव्र आजार, ऍसिड अटॅक व्हिक्टम, पार्किंसन्स सुलभ हलनचलन व बैठक व्यवस्थेसाठी शारीरिक मूल्यमापन इत्यादी करण्यात यावे.

१०. प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी मल्टीपल स्क्लेरोसिस, बॅलेस्सेमिया, हिमोफेलिया, मानसिक आजार, कुष्ठरोग, सिकलसेल निदान व उपचार शस्त्रक्रियापूर्व तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात यावे.

११. प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील विद्याच्यर्थ्यांसाठी शिबीरस्थळी तज्ज्ञ/पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष अनुषंगिक व्यवस्था करणे त्यासाठी सदर निधीतून खर्च भागविण्यात यावा.

१२. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई या कार्यालयाकडून मार्गदर्शक सूचना प्राप्त होताच आपणास अवगत करण्यात येईल.

१३. प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी सदर रक्कम ही कमाल मर्यादित असून शिबीरासाठी येणारे तज्ञ, पालक, शिक्षक व विद्यार्थी यांना नियमानुसार दैनिक भत्ता, प्रत्यक्ष प्रवासखर्च व अल्पोपहार अदा करण्यात यावा.

१४. वित्त नियमाच्या अधीन राहून खर्च करण्यात यावा व प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील खर्च प्रमाणके वेगवेगळी ठेवण्यात यावीत व तशी नोंद खर्च करताना PFMS प्रणालीवर नोंदविण्यात यावी.

१५. शिबीर आयोजित करुन रक्कम शिल्लक रहात असल्यास जिल्हा खाती रक्कम भरणा करण्यात यावी.

१६. सदर रक्कमेचे प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील सर्व शिबीरे आयोजित करुन समायोजन / उपयोगिता प्रमाणपत्र प्राथमिक व माध्यमिक निधीसाठी वेगवेगळे सादर करावे.

वरील प्रमाणे प्रति तालुका प्राथमिकस्तर रु.१०,०००/- (अक्षरी दहा हजार मात्र) व माध्यमिकस्तर या शिर्षाखाली प्रत्येकी तालुका रु.१०,०००/- (अक्षरी दहा हजार मात्र) या प्रमाणे १४ तालुक्यांसाठी रु. २,८०,०००/- (अक्षरी दोन लक्ष ऐंशी हजार मात्र) निधी गटशिक्षणाधिकारी यांना अग्रीम स्वरुपात वर्ग करण्यास या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे. सदरचा खर्च समावेशित शिक्षण मधून करण्यात येईल.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र 202507211660069 असा आहे.

**(आनंद भंडारी)** भा.प्र.से.
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

**प्रति,**

**गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती -----------(सर्व)**